MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात



आष्टी ( प्रतिनिधी)

समग्र शिक्षा अंतर्गत राज्यातील २२७३ शाळेमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापित केल्या असून प्रत्येक शाळेवर या संगणक प्रयोग शाळेसाठी एक इन्स्ट्रक्टर सुद्धा रुजू करण्यात आलेले आहे, आधुनिक काळात टिकायचे असेल तर संगणकाशी मैत्री करावी लागेल व ते शिकावं पण लागेल हे उद्दिष्ट समोर ठेवून, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई ,राज्य प्रकल्प संचालक श्रीमती आर विमला मॅडम यांनी आयसीटी (इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी)हा उपक्रम राबविण्याचे योजिले आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील १०१ शाळेमध्ये हा उपक्रम चालु असुन, अतिशय चांगल्या प्रकारचा उपक्रम राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई, श्रीमती. आर विमला मॅडम यांच्या सुचनेप्रमाणे व बीड जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी श्री.भगवान फुलारी सर (प्रा.) यांच्या मार्गदर्शनाने राबविण्यात येत आहे, तर येणाऱ्या काळात या उपक्रमाचा विद्यार्थ्यांना निश्चित फायदा होणार आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –३४९ | मंगळवार दि.१० सप्टेंबर २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -349 | TUESDAY DT.10 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# मराठवाड्याची तहान भागणार!

## जायकवाडी धरणाचे १८ दरवाजे उघडले, १४३२ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु

**छत्रपती संभाजीनगर – छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जायकवाडी धरणाचे १८ दरवाजे उघडण्यात आले असून १४३२ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुर करण्यात आले आहे. जायकवाडी धरण ९७.३० टक्के भरले असल्याने धरण प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. पाण्याची पातळी पाहून पाण्याचा पुढील विसर्ग वाढवायचा की नाही हे ठरवले जाणार असल्याची माहिती जलसंपदा विभागाने दिली आहे. गेल्या काही दिवसांत राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे गोदावरीच्या पाणी पातळीमध्ये वाढ झाली आहे.**

गेल्या आठवड्यात महाराष्ट्रसह मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस झाला. अजूनही मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर कायम असल्याचे दिसत आहे. या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जवळपास २२ लाख ४८ हजार ४४५ शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून १७ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. लातूर, हिंगोली, परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील अनेक गावांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे.

दरम्यान, जायकवाडी धरण भरल्याने शेकडो गावांच्या पाण्याचा प्रश्न तूर्तास मिटला आहे. यामुळे



पुढील दोन वर्षे पाण्याची टंचाई अनेक गावांमध्ये जाणवणार नसल्याचे बोलले जात आहे. याच सोबत औष्णिक वीज प्रकल्प, शेती सिंचन जायकवाडीच्या पाण्यावरच अवलंबून आहेत. सोमवारी जायकवाडी धरणाचे सहा दरवाजे ०.५ फुटाने उघडण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा आणखी सहा दरवाजे उघडण्यात आले. यावेळी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा धरण प्रशासनाने दिला होता.

मराठवाड्यातील प्रमुख धरणे गेल्या आठवड्यात झालेल्या पावसाने भरत आले असल्याचे दिसत आहे. जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, परभणीच्या निम्न दुधना प्रकल्पात सध्या ७५ टक्के पाणीसाठा आहे, येलदरी प्रकल्पात ७३ टक्के पाणीसाठा आहे, बीडच्या माजलगाव धरणात ३७.९८ टक्के पाणीसाठा आहे, तर मांजरा धरणात ७६.११ टक्के पाणीसाठा झाला आहे. नांदेडच्या उर्ध्वपनगंगेत ३३.४० टक्के पाणीसाठा असून धाराशीव येथील तेरणा धरण अद्याप दोन टक्क्यांवरच आहे.

## अंधारे मॅडम धरणं भरले, किमान चार दिवसाला पाणी सोडा – नवनाथ शिराळे पाटील

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरला पाणीपुरवठा करणारे बिंदुसरा धरण ओव्हरफ्लो झाले. तर माजलगाव बॅक वॉटर मध्ये पन्नास टक्के पेक्षा अधिक जलसाठा उपलब्ध आहे. गणपती, महालक्ष्मी सन चालू आहे. दसरा, दिवाळी तोंडावर असताना बीड करांना अजूनही पंधरा दिवसाला पिण्याचे पाणी मिळते. धरण उशाला आणि जलसाठा असूनही बीडकरांच्या घशाला कोरड कायम आहे.



नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी प्रशासक व नगरपालिकेचे सीओ अंधारे मॅडम यांनी वेठीस धरू नये. तातडीने किमान चार दिवसाला पिण्याचे पाणी सोडण्याचा निर्णय घ्यावा. असे आवाहान भाजपाचे माजी नगरपरिषद सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

बीड शहरातील नागरिक रहिवासी नगरपालिकेचा कर, पाणी पट्टी, घर पट्टी इमाने इतबारे वर्षाची वर्षाला नगरपालिकेला भरणा करतात. लाखो रुपयाचा कर व्याजासह बीड शहरातील नागरिक नगरपरिषद कडे भरणा करतात. या पैशाचा सदुपयोग करून जनतेला पाणी दिले पाहिजे. एकीकडे रोख कर घेतात परंतु त्या मोबदल्यात जबाबदारी असूनही पाणी मिळत नाही. अनेक कारणे सांगून नागरिकांचे तोंड बंद करतात. ही कारणे ऐकून नागरिकांचे कान बधीर झाले आहेत. त्यांच्या सहनशिलतेचा अंत न पाहता जनतेच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी. असे आवाहन भाजपा नेते तथा माजी न.प. सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

### राक्षसभूवनच्या राष्ट्रवादीला पुन्हा खिंडार

## अमरसिंह पंडितांना सोडून असंख्य कार्यकर्ते बदामराव पंडित यांच्या फौजेत दाखल

गेवराई।प्रतिनिधी

विधानसभेच्या निवडणुका जवळ येऊ लागताच गेवराई विधानसभा मतदारसंघातील राजकीय वातावरण बदलू लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आ अमरसिंह पंडित यांना सोडचिठ्ठी देऊन राक्षसभुवन, परसराम तांडा आणि चव्हाणवाडी तांडा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. यामुळे राष्ट्रवादीला पुन्हा एकदा मोठे खिंडार पडले आहे.

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे सतत जनतेत राहून त्यांच्या अडीअडचणी सोडवत असल्याने गेवराई विधानसभा मतदारसंघातील सामान्य माणसाला ते जवळचे वाटतात. त्यातच गेवराई तालुक्यातील राजकारणात अनेक घडामोडी घडल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विजयसिंह पंडित यांनी शरद पवार यांना सोडून अजित पवार यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे तालुक्यातील शरद पवार यांना मानणारा वर्ग या दोन्ही पंडित बंधूवर नाराज झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अमरसिंह पंडित यांनी तालुक्यात शिवसेना फोडाफोडीचे काम सुरू करताच, बदामराव पंडित यांनीही आता अजित पवार राष्ट्रवादीला हिसका दाखवायला सुरुवात केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांच्या राक्षसभूवन या गावातच राष्ट्रवादीला पुन्हा एकदा मोठे खिंडार पडले आहे. राक्षसभूवन येथील राजेंद्र नाटकर, सोमनाथराव धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते सुभाष पोटफोडे यांच्यासह रवी सुतार, शामराव कुऱ्हाडे, अर्जुन आहेर, संतोष आहेर, सुरज आहेर, शाहेद बागवान, सनी पोटफोडे, रोहन धुमाळ, आदित्य आहेर, परसराम तांडा येथील रामेश्वर राठोड, परमेश्वर राठोड, ज्ञानेश्वर राठोड, शमेश्वर राठोड, चव्हाणवाडी तांड्यावरील विष्णू चव्हाण, ताराचंद चव्हाण आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. बदामराव पंडित आणि युवानेते यशराज पंडित यांनी सर्वांच्या गळ्यात भगवे



रुमाल घालून त्यांचे स्वागत केले. आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला सन्मान देऊन राजकीय संधी दिली जाईल. कोणतेही काम असू द्या मला हक्काने सांगा पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील असा विश्वास यावेळी बदामराव पंडित यांनी व्यक्त केला आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत मोठ्या प्रमाणात बोगसगिरी..!

### गेवराई तालुक्यातील अनेक शाळेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षक निवडीत वशिलेबाजी सुसाट.?

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारकडून विविध योजना आणल्या जात आहेत. महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना तर आता १८ ते ३५ वयातील युवकांसाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत जिल्हा परिषद प्रशासन लगबगीने जिल्हा परिषद शाळांवर प्रशिक्षणार्थी शिक्षक म्हणून नियुक्ती दिली आहे. तसेच परीपत्रक काढलेले आहेत. त्या परिपत्रकानुसार गेवराई तालुक्यातील प्रत्येक शाळेत मुख्याध्यापकांनी डीएड, बीएड, ग्रेड्युएट, एमए, पदवीधर आणि पदव्युत्तर यांचे अर्ज मागविण्यात आले होते. मात्र मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी शिक्षकाच्या निवडीमध्ये मोठ्या प्रमाणात वशिलेबाजी करून बोगसगिरी केली आहे. असा आरोप गोर सेनेच्या वतीने करण्यात आला आहे. अशा मनमानी कारभारामुळे खरे उमेदवार अपात्र ठरले असून, अनेक ठिकाणी बशिलेबाजीने निवड करण्यात आले असल्याचे बोलले जात आहे. झालेल्या निवडी रद्द करून नव्याने नियमानुसार निवडी करण्यात यावी, यासह विविध मागण्यांसाठी**



**मनमानी कारभार बंद करून; बोगस निवडी केलेल्या तात्काळ रद्द करा.!**
**शासनाच्या नियमानुसार पुन्हा निवडी करण्यासाठी गोर सेनेचे पंचायत समितीसमोर आंदोलन**
**याप्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई होणार का..?**

**गोर सेनेच्या वतीने गेवराई पंचायत समिती कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले आहे. नियमांच्या अधीन न राहता सगळा मनमानी कारभार तसेच वशिलेबाजी करून मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी शिक्षकांची निवड करण्यात आलेली आहे.**

गेवराई तालुक्यातील अनेक गावातील शाळेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार निवडी न झाल्याने याबाबत गोर सेनेच्या वतीने दि.०५ सप्टेंबर रोजी निवेदन देऊन या निवडीत शैक्षणिक अर्हता उमेदवारांची निवड करण्यात यावी, तसेच शासनाच्या जीआर नुसार निवड करावी, यासह अनेक मागण्यांसंदर्भात निवेदन देण्यात आले होते. मात्र याबाबत काहीच कारवाई न झाल्याने गोर सेनेच्या वतीने गेवराई पंचायत समिती कार्यालयासमोर सोमवार दि.०९ सप्टेंबर रोजी आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. यामध्ये सदरील भरती निकषानुसार जाहीर पद्धतीने व शासनाच्या जीआर नुसार निवड करावी, या निवडीसाठी तालुकास्तरावर समिती नेमण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. गेवराई तालुक्यातील अनेक शाळेमध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी शिक्षकाची निवड मनमानी करून कुठलाच नियम न वापरता करण्यात आली आहे. तरी सर्व प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी गोर सेनेच्या वतीने गेवराई पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. जोपर्यंत गटशिक्षणाधिकारी झालेल्या बोगस निवडी रद्द करून नव्याने शासनाच्या नियमानुसार निवडी करत नाही. तोपर्यंत आमरण उपोषण सुरू ठेवण्याचा आक्रमक पवित्रा आंदोलनकर्त्यांनी घेतला आहे. आजच आंदोलनाचा दुसरा दिवस आहे. उशीरापर्यंत आंदोलन सुरू होते.

## बीड येथे मा.समाजभूषण भीमराव हत्तीअंबीरे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो आंबेडकरी कार्यकर्त्यांचा

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष प्रवेश सोहळा संपन्न

वडवणी ।प्रतिनिधी

दि.०१सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रवादी भवन बीड येथे दुपारी १:०० वा. समाजभूषण मा.भीमराव हत्तीअंबीरे साहेब (उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार तथा प्रभारी,सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रदेश नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार ) यांच्या प्रमुख उपस्थित व जिल्हाध्यक्ष मा आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवेश सोहळा संपन्न झाला

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण खासदार शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचाराने प्रेरित होऊन अनेक कार्यकर्ते पक्षात प्रवेश करीत आहेत.हे खरे असले तरी हत्तीअंबीरे यांच्या निवडीमुळे आंबेडकरी चळवळीतील हजारो कार्यकर्ते राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याचा झंझावात सुरू झाला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा फुले शाहू आंबेडकर यांच्या विचाराला मानणारा पक्ष आहे.शरदचंद्र पवार यांनी सत्तेचा विचार न करता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव तत्कालीन औरंगाबाद व आत्ताचे छत्रपती संभाजी नगर विद्यापीठाला नाव देणारा महाराष्ट्रातील एकमेव धर्मनिरपेक्ष नेता शरदचंद्र पवार साहेब आहेत तसेच सर्वसामान्य माणसाला न्याय देणारा पक्ष आहे असे ग्वाही समाजभूषण माननीय भीमराव हत्तीअंबीरे साहेब यांनी बीड येथे पक्ष प्रवेश सोहळ्याच्या निमित्ताने बोलताना म्हणाले की ७५ वर्ष झाले भारत देशाला स्वातंत्र्य होऊन मात्र बहुजन समाजातील अनेक घटक सत्ते पासून वंचित आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की राजकीय सत्ता हस्तगत करायची असेल तर आघाड्यांचं राजकारण केले पाहिजे परंतु या देशात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने लोकांना भावनिक ब्लॅक मेल करायचे आणि जातीवादी पक्षाशी समजोता करायचा व स्वतःची राजकीय पोळी भाजून घ्यायची अशा पध्दतीने बहुजन समाजाला गुमराह करायचे आणि स्वतंत्र निवडणुका लढायच्यायाचा फायदा जातीवादी पक्षा करुन द्यायचा आता माझा बहुजन समाज असल्या भूलथापांना बळी पडणार नाही. आणि येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मातीत गाठण्यासाठी महाविकास आघाडी ला जास्तीत जास्त आपले मत देवून आपण सत्तेत सहभागी व्हायचे आहे म्हणून आता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन ब्लॅक मेल करणारांनाच आत्ता आपण ब्लॉक करावे असे आवाहन समाजभूषण भीमराव हत्तीअंबीरे यांनी बोलताना केले आहे.



यावेळी आंबेडकरी चळवळीतील रिपाई,वंचित बहुजन आघाडी,व जेष्ठ विचारवंत,नेते यांच्या सह अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला त्यापैकी महत्वाचे जेष्ठ नेत्यांच्या नावाचा उल्लेख आवश्यक आहे ते बीड येथील आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते ड सिध्दार्थ शिंदे,ड सुधीर माने,गेवराई येथील विजय वाव्हाळ,सिरसाळा येथील वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते प्रमोद किरवले, माजलगाव येथील रिपाईचे तालुका उपाध्यक्ष आण्णा माने,राहुल सिरसट,माधव मोरे,रामचंद्र माने,बाबुभाई शेख,माऊली कचरे,राहुल मोरे,उमाजी सिरसट,सुमित सिरसट,अशोक माने,धम्मा वाव्हकर,शहादेव लोंढे,केशव लोंढे,यशपाल मोरे,कृष्णा आव्हाड, शंकर माने,आष्टी येथील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष तथा आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, माजलगाव विधान सभा अध्यक्ष नारायणराव डक,प्रा प्रकाश जेधे,मनोहर डाके,युवराज काका लगड,सुरेश भोरे, संभाजीनगर येथील जिल्हा सचिव विष्णू जगताप,सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष पंकज हजारे,ड भास्कर उजगरे, डॉ श्रीराम खळगे,दिपक उजगरे, दिलीप मकासरे,शहादेव लोंढे,खलील पठाण, बाळासाहेब जगताप, राजेश जोगदंडे, शांतीलाल जोगदंडे, रावसाहेब मस्के, संजय जोगदंड, त्रेबक शेळके, मधुकर काशीदे, बबन जोगदंड, राहुल सिरसाठ, माने सर, महादेव मोरे, माऊली कचाटे,सुरेश सावंत,अमित कांबळे,प्रेम पंडित,अँड. ए. डी. शिले, इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अल्पसंख्याक समाजातील उम्मे हनी शेख यांचे काम प्रेरणादायी- सौ. जयश्री विधाते

**बीड ।प्रतिनिधी**

**शहरात थोड्याच दिवसात नावारूपाला आलेली कॉसमिक बकस या संस्थेने शेकडो विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तर हाजारो विद्यार्थ्यांना ऑनलाईन बकसचे प्रशिक्षण दिले असुन बीड शहरच नव्हे तर बीड जिल्ह्यातील आणि पुणे मुंबई सारख्या मेट्रो सिटी तील अनेक विद्यार्थी घडविण्याचे काम केले आहे , अल्पसंख्याक समाजातील सर्वसाधारण परिवारातील एक मुलगी ज्या वयात शिक्षण घ्यायचे त्या वयात शिक्षणाबरोबरच अनेक विद्यार्थ्यांना बकसचे धडे देण्याचे जे काम करते ते फक्त अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठीच नव्हे तर सबंध महीला व मुलींसाठी प्रेरणादायी आहे असे गौरवोद्गार कॉस्मीक बकस च्या बक्षीस आणि प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमच्या मुख्य अतिथी बीड नगरपरिषदेच्या माजी सभापती तथा नगरसेविका सौ. जयश्री**



**विलास विधाते यांनी काढले.**

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे युवानेते प्रा. अमर शेख तर प्रमुख अतिथी म्हणून सौ. जयश्री विधाते माजी सभापती नगरपरिषद बीड तथा जयदत्तजी आण्णा क्षीरसागर विचारमंच महीला आघाडी विधानसभा प्रमुख, ड. जेबा कादीर पोलीस हक्क संघर्ष समिती, प्रा. संगीता शिंदे, पत्रकार अशोक होळकर यांची उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमाचे आयोजक शेख मुख्तार यांच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला, संस्थेच्या संचालिका उम्मे हनी यांच्या प्रास्ताविकांने कार्यक्रमाची सुरुवात तर रफीकसर यांच्या आभारप्रदर्शने सांगता झाली. यावेळी बीड शहरासह जिल्ह्यातुनच नव्हेतर मुबंई -पुणे- औरंगाबाद- लातूर या शहरातुन यशस्वी प्रशिक्षणार्थी विद्यार्थी पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## पुढील आठ दिवसात नुकसानीचे सॅम्पल सर्व्हे करून १५ दिवसात शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या

# नुकसानीचा अग्रीम पिक विमा मिळावा : कृषी मंत्री धनंजय मुंडेंच्या पिक विमा कंपनीस कडक सुचना

बीड ।प्रतिनिधी

मागील काही दिवसात झालेल्या सततच्या पावसाच्या पाण्यामुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून तातडीने त्याचे सॅम्पल सर्व्हे विमा कंपनी व कृषी विभागाने संयुक्तरित्या ८ दिवसात पूर्ण करुन त्यापुढील १५ दिवसात शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा अग्रीम पिक विमा मिळावा, असे निर्देश कृषी मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज श्री मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. याबैठकीस आ.बाळासाहेब आजबे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, रा कॉ चे जिल्हाध्यक्ष ऍड.राजेश्वर चव्हाण , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा कृषी अधिक्षक बाबासाहेब जेजुरकर, आत्माचे प्रक्लप संचालक सुभाष साळवे यांच्यासह विमा कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी पिक विमा कंपण्यांचे प्रतिनिधींना पुढील आठवडयाभरात कृषी विभागाच्या सहकार्याने नमुना सर्वेक्षण करून त्याच्या पुढील १५ दिवसात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमाचा लाभ मिळाण्याबाबत सुचना केल्या. नमुना सर्वेक्षण करताना कुठलेही चुक अथवा दुर्लक्ष विमा कंपण्यांकडून झाली असल्यास अशा कर्मचाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल केले करावेत असेही निर्देश पालक मंत्री यांनी यावेळी दिले. बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झालेल्या सर्व महसूल मंडळातील नुकसानीच्या भरपाईचे नैसर्गिक आपत्ती अनुदान मागणीचे अहवाल राज्य शासनास तात्काळ सादर करावेत, असेही निर्देश धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनास दिले आहेत.

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणीचा घेतला आढावा

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण यां योजनेचा आढावा पालक मंत्री श्री मुंडे यांनी घेतला असून जिल्हयातील एकूण ६ लाख ४१ हजार १४७ महिलांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. यापैकी ६ लाख १६ हजार ७८८ महिलांचे अर्ज मंजुर झालेले असल्याची माहिती जिल्हाधिकारी श्री. पाठक यांनी श्री. मुंडे यांना दिली. १२ हजार ६११ अर्जांवर मंजुरी देण्याची प्रक्रिया सुरू असून ११ हजार ७४८ अर्ज विविध कारणांनी प्रलंबित असल्याचे जिल्हाधिकारी यांनी पालक मंत्री यांना सांगितले, उर्वरीत अर्जांवरील समस्या लवकर दूर करून त्यांनाही मंजुरी देण्याचे निर्देश पालक मंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी केल्या.

## नफरवाडीची सुकन्या कु. ऋतुजा भीमराव मंडलिक हीचा मेडिकल सीईटी मध्ये निवड



पाटोदा- पासून जवळच असणाऱ्या नफरवाडीची भूमी कन्या कु. ऋतुजा भीमराव मंडलिक (फौजी) यांची मुलगी मेडिकल सी. ई. टी. पात्र होऊन गव्हर्नमेंट कॉलेज छत्रपती संभाजीनगर येथे प्रवेश निश्चित झाल्यामुळे समस्त गावकऱ्यांतर्फे तिचा सत्कार करून गुण गौरव करण्यात आला. याप्रसंगी गावचे सरपंच मा.श्री बंडू सवासे तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य माजी सरपंच मा. भीमराव तांबे माजी ग्रामपंचायत सदस्य सर्व तसेच गावातील प्रतिष्ठित व्यक्ती तरुण मंडळी माता भगिनी नफरवाडी येथील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मा. अण्णासाहेब खंडागळे सर सहशिक्षक मा. मुरूमकर सर व सर्व स्टाफ नफरवाडी पंचक्रोशीतील शिक्षण प्रेमी नागरिक तसेच युवा नेते श्याम घुले पाटील सेवानिवृत्त जेष्ठ शिक्षक मा. श्री दत्तात्रय ढेरे सर सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री संजय सावंत सर यांच्या उपस्थितीत पार पडला. कु. ऋतुजा गावात आल्याबरोबर एसटी स्टँड पासून ग्रामपंचायत कार्यालयापर्यंत ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली व कार्यक्रमाला सुरुवात झाली

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला तसेच आईवडिलांचाही शाल श्रीफळ देऊन गावकऱ्यांतर्फे सत्कार करण्यात आला. युवा नेते श्याम हुले यांचा सत्कार करण्यात करून खंडागळे सर मुरूम सर यांचाही सत्कार केला नंतर या मुलीचा भाऊ गेल्या वर्षी बी ए एम एस ला नंबर लागला होता म्हणून माजी सरपंच श्री भिमराव तांबे यांनी त्याचा सत्कार केला तर नफरवाडीच्या ग्रामपंचायत कार्यालयातर्फे सरपंच श्री बंडू सवासे उपसरपंच श्री बंटी तांबे व सर्व सदस्य व मा.संजय सावंत सर यांनी कु. ऋतुजा मंडलिक हिचा सत्कार फेटा बांधून पुष्पगुच्छ देऊन केला. यानंतर मा. दत्तात्रय ढेरे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करून मुलीला भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. तर मुख्याध्यापक श्री संजय सावंत सर यांनीही कुमारी ऋतुजा हिने जिद्द चिकाटी व खूप परिश्रम करून यश संपादन करून आई वडिलांचे नाव उज्वल केले. त्याचप्रमाणे नफरवाडीचेही नाव उज्वल केले उपस्थित असणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना ऋतुजाचा आदर्श घेऊन आपणही अशीच गरुड झेप घेऊन यश संपादन करावे तुमचाही असा सत्कार केला जाईल हे सांगितले नफरवाडी ची पहिली ही मुलगी एमबीबीएसला लागलेली आहे तसेच आतापर्यंत नफरवाडी सारख्या खेड्यातील मुले सर्व क्षेत्रातही चमकले आहेत हे सांगितले पहिला एमबीबीएस विद्यार्थी डॉ किरण विठ्ठलराव सवासे डॉ. बलभीम तांबे डॉ. राम रंगनाथ तांबे डॉ. पूजा बाळासाहेब तांबे डॉ. अशोक अंबादास मंडलिक वसंत मंडलिक फौजी यांची मुलगी डॉक्टर झालेली तसेच ऊसतोड कामगार औटे यांची मुलगी डॉक्टर झालेली यांचा उल्लेख केला शिक्षक डी फार्मसी एम फार्मसी डी एच एम एस बी एच एम एस तसेच नर्स सैनिक कृषी खाते एसटी महामंडळात दराडे यांची मुलगी पोलीस खात्यात आहे अशा यशस्वी तरुणांचा तरुणींचा उल्लेख केला आणि कु. ऋतुजा मंडलिक हिने यापुढे जाऊन एमडी करून स्त्री रोग तज्ञ वगैरे स्पेशलिस्ट डॉक्टर व्हावे यासाठी शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमासाठी या मुलीचे नातेवाईक आजोबा श्रीधरराव मंडलिक माजी सैनिक विकास मंडलिक यश कॉम्प्युटरचे मालक बाळासाहेब मंडलिक अर्जुन मंडलिक तसेच शिवाजी ढेरे दादासाहेब ढेरे अशोक सवासे बालू सवासे गावातील प्रतिष्ठित नागरिक युवक वर्ग माता-भगिनी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी विद्यार्थिनी हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संजय सावंत सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री मुरूमकर सर यांनी केले नाष्टा चहापानानंतर कार्यक्रम संपला

### इमारतीच्या बांधकामाचे घोंगडे भिजत; मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी आंदोलन:- डॉ.गणेश ढवळे




# नेकनुर पोलिस ठाण्याचा कारभार पत्र्याच्या शेडमध्ये

बीड ।प्रतिनिधी


नेकनुर येथील निजामकालीन पोलिस ठाण्याच्या नविन ईमारत बांधकामासाठी ६ कोटी ६४ लाख रुपये निधी मंजूर होऊन २ वर्ष उलटूनही अद्याप बांधकामाला मुहूर्त लागला नसल्याने व सद्यस्थितीत जागा अपुरी पडत आहे तसेच पावसाळ्यात छत सुद्धा गळत असल्याने या ठिकाणी पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना पत्र्याच्या शेडमध्ये कामकाज करावे लागत आहे. त्यामुळे तातडीने बांधकाम सुरू करण्यात यावे तसेच दिड लाख लोकसंख्येच्या ९७ गावात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम या ठाण्यांतर्गत असुन नुकत्याच झालेल्या बदल्यात दोन पोलिस उपनिरीक्षकांच्या जागा रिक्त असुन तातडीने भरण्यात याव्यात यासाठी दि.१७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन अप्पर पोलीस अधीक्षक बीड सचिन पांडकर यांना डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, शेख युनुस,शिवशर्मा शेलार , शेख मुबीन यांनी दिले आहे.नेकनुर पोलिस ठाण्याची ईमारत निजामकालीन असुन सन २०२१-२२ मध्ये नविन ईमारत बांधकाम व पोलिस वसाहतीसाठी ६ कोटी ६४ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता.त्यानंतर पोलिस वसाहत पाडुन २ वर्षे उलटली मात्र अजुनही बांधकामाला मुहूर्त मिळाला नाही.सद्यस्थितीत ईमारत अपुरी पडत आहे तसेच पावसाळ्यात छत सुद्धा गळते त्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पत्र्याच्या शेडमध्ये कामकाज करावे लागत आहे. सुसज्ज इमारत नसल्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तातडीने इमारत बांधकाम सुरू करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.बीड तालुक्यातील नेकनुर पोलिस ठाण्याला सध्या २ अधिकारी व ४४ पोलिस कर्मचारी कार्यरत आहेत.एकुण दिड लाख लोकसंख्येच्या ९७ गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी यांच्यावर आहे. या ठाण्यांतर्गत धुळे- सोलापूर व अहमदपूर - अहमदनगर हे दोन राष्ट्रीय महामार्ग येत असुन याठिकाणी वाहनांची प्रचंड वर्दळ सुरू असुन अपघातांचे वाढते प्रमाण अपघाताची घटना घडल्यास घटनास्थळी पोहचण्यास उशीर लागतो.त्यातच काही जणांना वायरलेस ड्युटी, काहींना कोर्ट ड्युटी, काही जणांची साप्ताहिक सुट्टी, आजारपण यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडत आहे.त्यातच नुकतेच २ पोलिस उपनिरीक्षक यांच्या बदल्या झाल्याने त्यात जास्तीची भर पडली असुन तातडीने रिक्त पदे भरण्यात यावीत. विशेष म्हणजे पोलिस स्थापनेच्या वेळी जी पोलिस कर्मचारी संख्या होती आजही तेवढीच आहे त्यामुळे आवश्यक कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली आहे.मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाड्यातील तब्बल ७० निजामकालीन पोलिस ठाणे नव्याने बांधण्यात येणार असल्याची घोषणा तत्कालीन सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली होती. मात्र याबाबत कोणतीही हालचाल न झाल्याने डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली दि.१७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्फत मुख्यमंत्री,



प्रतिनिधी जावेद पठान शिक्षकांचा भोंगळा कारभार लऊळ नं २ जिल्हा परिषद शाळा वडवणी तालुक्यातील लऊळ नं २ जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांचा मनमानी कारभार चालु आहे गेल्या पंधरा दिवसांपासून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आणी शाळेला वाऱ्यावर सोडले आहे एक दिवस येतात तासभर थांबुन निघुन जातात त्या मुळे गावकऱ्यांन मध्ये संतापाचे वातावरण आहे

# मुख्यमंत्री शिंदेना मागासवर्गीय विकास योजनांचा पडला विसर-अॅड भास्कर उजगरे

महाराष्ट्रातील आंबेडकरी जनतेला माहीत आहेत.कारण,राष्ट्रवादी काँग्रेस,शिवसेना महाविकास आघाडीचे सरकार गेले व नवीन सरकार स्थापन झाले. एकनाथजी शिंदे मुख्यमंत्री झाले. सामाजिक न्याय विभाग हे खाते मुख्यमंत्री यांनी आपलेकडे ठेवले. माझे माहितीप्रमाणे हे पहिल्यांदा घडले की सामाजिक न्याय खात्याचे मंत्री, मुख्यमंत्री झाले. आम्हाला वाटले आता सामाजिक न्यायाचे काम होईल. परंतु, हा विभाग दुर्लक्षित राहिला. मुख्यमंत्री विसरले असतील की त्यांचाकडे सामाजिक न्याय विभागाची महत्वाची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री यांचेकडे विभाग असेल तर त्या विभागात प्रचंड हालचल व गुणात्मक बदल दिसला पाहिजे. जसे चालले तसे चालत असेल तर मुख्यमंत्री यांचेकडे विभाग असून काय उपयोग? अनुसूचित जाती जमातीच्या विकासासाठी बजेट कायदा करण्यासाठी काहीच प्रयत्न झाल्याचे दिसत नाही. वार्षिक बजेट मध्ये डल, डीं च्या लोकसंख्येचे प्रमाणात डलीं/ढीं बजेटमध्ये निधीची तरतूद करण्यात आली नाही. मागील दहा वर्षात जवळपास ४० हजार कोटींचा निधी नाकारला गेला. नवीन सरकारच्या काळात ही पूर्ण निधी मिळाला नाही. ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर ही त्याबाबत काही कारवाही नाही. अट्रोसिटी अॅक्ट १९८९ व सुधारित २०१५, सुधारित नियमावली २०१६ च्या नियम १६ नुसार राज्यस्तरीय दक्षता व देखरेख समिती फार उशिरा गठीत तर केली. परंतु बैठक घेऊन जातीय अत्याचाराच्या घटना राखण्यासाठी



उपाययोजना केल्या नाहीत. २०१८ मध्ये शेवटी बैठक झाली होती, त्यांनतर आतापर्यंत झाली नाही. मुख्यमंत्री हे या राज्य समितीचे अध्यक्ष आहेत. सामाजिक न्याय विभागाचे मंत्री सुद्धा आहेत. तरीपण बैठक न होणे म्हणजे दुर्लक्ष व उदासीनता म्हणता येईल.भूमिहीनांना ४ एकर कोरडवाहू जमीन देण्याची आर्थिक विकासाची स्वाभिमान योजना आजही व्हेंटिलेटरवर आहे. ही महत्त्वाची योजना प्रभावी व प्रवाही करण्यासाठी प्रयत्न झाल्याचे दिसत नाही. वर्ष २०२२ मध्ये आम्ही सुमंत भांगे सामाजिक न्याय मुख्य सचिव यांचे विरुद्ध जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे तीव्र निषेध व निदर्शने आंदोलन केले होते, त्यामध्ये प्रमूख मागणी बार्टीचे सर्व केंद्रांना आर्थिक साहाय्य देणे,जातीवादी सुमंत भांगे यांची सचिव पदावरुन हाकाल पट्टी करावी, शिक्षणासाठीच्या,शिष्यवृत्ती, फी माफी,नामवंत शैक्षणिक संस्थेत शिक्षण,परदेशी शिक्षण,डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वलंबन स्वाधार योजनेचे बजेट तात्काळ वाटप करावे,सामाजिक न्याय व वित्त सहाय्यक विभागाचा निधी इतरत्र वळवू नये, रमाई घरकुल योजना २००८ पासूनची आहे. १५-१६ वर्ष झालीत. फलश्रुती काय? ह्याचा अभ्यास झाला नाही. हॉस्टेलमध्ये सेवा-सुविधात सुधारणा करणे गरजेचे असताना, १२ वर्ष होऊन ही कोणतीही सुधारणा झाली नाही. स्वाधार योजनेचे तसेच. वर उल्लेखित योजना व विषय यामध्ये नवीन काय झाले? सामाजिक न्याय विभागाला पूर्ण निधी का मिळाला नाही व मिळालेला निधी पूर्णपणे खर्च का झाला नाही? अखर्चित निधीचे काय झाले? बजेटचा कायदा का होत नाही? अट्रोसिटीची राज्यस्तरीय बैठक का होत नाही? योजनांची प्रभावी अंमलबजावणी का नाही? मुख्यमंत्री यांनी जनतेला सांगावे.

असे ड भास्कर उजगरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.....

# मुस्लीम महेदवीया समुदायाशी संबंधित महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रातील गंभीर त्रुटी सुधारा

## सय्यद अली दिलावर फर्रूख़ आणि एस.एम.युसूफ़ यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

बीड ।प्रतिनिधी

मुस्लीम महेदवीया समुदायाशी संबंधित महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रातील गंभीर त्रुटी सुधारा अशी मागणी एल.एम.एम.ग्रुप ग्लोबल संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद अली दिलावर फर्रूख़ आणि जिल्हाध्यक्ष तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अल्पसंख्यांक कल्याण मंत्री आणि राजपत्र विभागाचे कार्यकारी संपादक तथा सचिव डॉ. डी.पी. बाळसेकर यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.



याविषयी ई-मेल द्वारे पाठविलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, दिनांक १० मे २०२२ रोजी राजपत्र विभागाचे कार्यकारी संपादक तथा सचिव डॉ. डी.पी. बाळसेकर यांना मुस्लिम महेदवीया समुदायाशी संबंधित महाराष्ट्राच्या सरकारी राजपत्रातील गंभीर त्रुटी दुरुस्त करण्याची विनंती केलेली आहे. विनंती केलेली सर्व कागदपत्रे १४ मे २०२२ रोजी महाराष्ट्र राजपत्र विभागाच्या सचिवांना देण्यात आली आहेत. महाराष्ट्र राजपत्र विभागाच्या सचिवांनी त्यांची शिफारस महाराष्ट्र सरकारच्या अल्पसंख्यांक विभागाच्या मुंबई येथील उपसचिवांकडे दिनांक १७ एप्रिल २०२३ रोजी मंजुरीसाठी पाठवली आहे. आजपर्यंत, राजपत्र विभागाच्या सचिवांना महाराष्ट्र सरकारच्या अल्पसंख्यांक विभागाच्या उपसचिवांकडून मंजुरी मिळालेली नाही. तरी कृपया उपसचिवांना या मंजुरीला गती देण्याचे निर्देशित करावे. यामुळे महाराष्ट्र राजपत्र विभागाच्या सचिवांना आवश्यक सुधारणा करता येतील. विशेष म्हणजे याविषयी राजपत्र विभागाचे कार्यकारी संपादक तथा सचिव डॉ. डी.पी. बाळसेकर यांनी दिनांक १७ एप्रिल २०२३ रोजी मंत्रालयातील अल्पसंख्यांक विभागाचे उपसचिव यांना पत्र पाठवून दीड वर्षाचा मोठा कालावधी उलटूनही मंत्रालयातील अल्पसंख्यांक विभागाच्या उपसचिवांनी अद्यापपर्यंत राजपत्र विभागाचे कार्यकारी संपादक तथा सचिव डॉ. डी.पी. बाळसेकर यांच्या पत्राला अनुसरून अजून कोणतीही कारवाई केली नाही किंवा पत्राला उत्तरही दिले नाही. यामुळे दिनांक ७ सप्टेंबर २०२४ रोजी सय्यद अली दिलावर फर्रूख यांनी तर ९ सप्टेंबर २०२४ रोजी एस.एम.युसूफ़ यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ई-मेलद्वारे याविषयी सविस्तर माहितीचे निवेदन पाठविले असून मुस्लीम महेदवीया समुदायाशी संबंधित महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रातील गंभीर त्रुटी सुधारण्याची मागणी केली आहे.



ग्रुप ग्रामपंचायत नांदुर हवेली मुख्यमंत्री योजना दुत पदी शाकेर पटेल यांची निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देताना रेहान पटेल, नारायण लकडे,अनिल बुधनर,अजिनाथ बुधनर,अमोल बुधनर

# मराठा, दलित, मुस्लिम एकत्र येऊ या, गरिबांची सत्ता काबीज करू - मनोज जरांगे

आमची सामाजिक आघाडी आहे, हीच खरी शिवशक्ती भीमशक्ती आहे - दीपक केदार

मराठा आंदोलक मनोज जरांगे आणि दलित, मुस्लिम, आदिवासी समूहाचे नेते दिपक केदार यांनी ऑल इंडिया पँथर सेनेच्या जिल्हा कार्यालयाचे उदघाटन केले. जिल्हा अध्यक्ष नितीन सोनवणे यांचे हे संपर्क कार्यालय आहे.यावेळी मनोज जरांगे यांनी सत्ता काबीज करण्यासाठी मुस्लिम दलितांना साथ देण्याचे आवाहन केले पुढे बोलताना त्यांनी सांगितले. आपण वेगळे नाहीत. आपल्यात दुरावा निर्माण करणारा कोण आहे हे सगळ्यांना माहित आहे. आता जर आपण सगळे एक झालो तर ही गरिबांची सत्ता काबीज होणार. आपण तिघांनी ऐकमेकांच्या अंगावर येईच नाही हे ठरवलं पाहिजे. दांडा उचलणारे तीनच लोक आहेत. एक दांडा उचलतो मराठा, दुसरा मुसलमान, तिसरा दलित हे दांडके उचलणारे संपले कि सगळे भांडणं संपले. आपल्या तिघांवरती हे सत्ता काबीज करतात. मला कोणत्याही पदाची लालसा नाही, तुमच्या सर्वांच्या साक्षीने सांगतो मी जिवंत आहे तोवर हटत नाही. जर असाच अन्याय केला तर देवेंद्र फडणवीस सरकार पाडल्याशिवाय शांत बसणार नाही.

वर्षभरात अनेक ट्रॅप रचले, उपदव्याप केले. आमदार, खासदार, मंत्री, पक्षाचे कार्यकर्ते थकले आता अंतरवलीत अंधारात येऊन झाडाच्या खोडात लपून बसण्याची वेळ आली. मीडिया गेली कि हळूच येतात. म्हणजे इतकी वाईट परिस्तिथी सर्वसामान्यांच्या एकजुटीमुळे आली. ही एकजुटीची ताकद ओळखा. सर्व राखीव मतदारसंघात ७० हजार मत मराठ्यांची आहेत. यावेळी आपण सगळे मिळून ते सत्ता काबीज करू!आपला मुख्य शत्रू आपण ओळखला आहे. आंदोलन सुरु झाल्यापासून सामाजिक परिवर्तन आले आहे. ऍट्रॉसिटी ऍक्ट च्या गुन्ह्यात ९०% कमी झाली आहे. आपल्यात भांडणंच होऊ देईचे नाहीत.दलित, मुस्लिम, मराठा समाजाने क्रांती केली आणि लोकसभेला २९ जागा पाडून टाकल्या. आता येणाऱ्या निवडणुकीत सुद्धा गरिबांची सत्ता आणण्यासाठी पाडा म्हणलो कि पाडा आणि आणा म्हणलो कि आणा हे करावचं लागेल.

दलित, मुस्लिम बांधवानो, आपल्याला आता घरा घरात जाऊन आपल्या खऱ्या शत्रूची ओळख करून द्यावी लागेल. मी लय दिवस भुयार तयार केलं आणि एकदाच हिसका दाखवून दिला तसंच आपल्याला या समूहात करावे लागेल. राज्यच नाही देशात सुद्धा आपला परिणाम दिसेल एवढी क्रांती आणणार. बीड ते अंतरवली सराटी मला ८ तास लागतात एवढं प्रेम समाज करतो.शेतकरी, कष्टकरी, दलितांची सत्ता आणण्यासाठी सज्ज व्हा!ऑल इंडिया पँथर सेनेचे दीपकभाई केदार हे गोरगरिबांच्या न्यायासाठी लढतात त्यांना शुभेच्छा देतो असे मत मराठा आंदोलक आदरणीय मनोज जरांगे यांनी केले. यावेळी ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांनी जहाल मत व्यक्त करत मनोज जरांगेच्या अंगावर जो येईल त्याला हा भीमाचा वाघ सोडणार नाही. काल पर्वा बार्शीचं नवं अंड बाहेर आलं आहे. ते आजवर कुणाचंच झालं नाही. बाळासाहेब ठाकरे यांना कोंबडीचोराने धोका दिल्यावर अंडे घेऊन बाहेर पडलेला हाच आहे. त्याला कुणी तरी धमकी दिली तर अधिवेशनात देवेंद्र फडणवीस धमकी देणार्याला अटक करण्याची मागणी करत होते. आज त्या आमदाराने मनोज जरांगेचे तुकडे करण्याची धमकी दिली आता का त्याला फडणवीस अटक करा म्हणत नाहीत. त्याने खुलासा केला पाहिजे कुणाचे तुकडे करणार मराठा आंदोलकांचे? मराठा लेकरांचे? सामाजिक आंदोलनाचे? कि जरांगेचे? तुकडे कुणाचे याचा खुलासा झाला पाहिजे.अनेक राजकीय आघाड्या येत आहेत





# गोविंद इतापे यांच्यासह शेकडो युवकांचा मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव शहरातील शेळके गल्ली परिसरातील युवा कार्यकर्ते गोविंद इतापे यांच्यासह मित्रमंडळाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश केला. माजलगाव येथील मोहनराव जगताप यांच्या संपर्क कार्यालयात प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला यावेळी गोविंद ईतापे यांच्या मित्र मंडळाच्या सर्व युवकांनी मोहनराव जगताप यांच्या पाठीमागे संपूर्ण ताकद उभा करण्यासाठी हा प्रवेश करत असल्याचे सांगितले.

यावेळी मोहनराव जगताप त्यांनी सर्व युवकांसाठी आपले दार चोवीस तास उघडे असल्याचे सांगून युवकांच्या अडी अडचणी ते प्राधान्याने सोडवतील असे सांगितले. तसेच मोहनराव जगताप यांनी या युवकांच्या प्रवेशामुळे माझी ताकद वाढली असल्याचे सांगून गोविंद इतापे यांच्यासह सर्व युवकांचा यथोचित सन्मान केला. यावेळी गोविंद इतापे यांच्यासह पांडुरंग इतापे,अंगद रोमन, श्रीराम शेळके, गणेश शेळके, सुनील नावडकर, अनिल साळवे, बाळू साळवे, अशोक इतापे, नितीन शेळके, पांडुरंग गडदे, मोहसीन मोबीन, शेख हबीब, लक्ष्मीकांत साळवे, आकाश इतापे, सचिन धपाटे, रवी धपाटे, संभाजी मुंडे, सतीश रोमन, वशिष्ठ रोमन,मच्छिंद्र इतापे, विठ्ठलराव कोंबडे, अरुण गोमचाळे, भिकू पौळ, राम बावणे, संतोष वाघमारे, नाना पोळ, माऊली धुमाळ,दीपक सटाले,शिवाजी तांदळे, मेघराज नावडकर, मधुकरराव लोंढे, शिवाजी पवार, गजानन जाधव, गोपाल भंडारी, कृष्णा चौधरी, अर्जुन काकडे, अशोक जाधव, हबीब शेख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमाप्रसंगी संतोषराव यादव, माजी नगराध्यक्ष नानाभाऊ शिंदे, मा.नगरसेवक राम जगताप, शरदराव यादव, ईश्वर होके,जगदीशराव बादाडे,हनुमंतराव बादाडे, विलास महाराज बादाडे,राजेभाऊ वापटे,संभाजी नाईकनवरे,बप्पा देशमुख,प्रकाश चव्हाण,सिद्धेश्वर डाके, सरपंच अविनाश गोंडे, भालचंद्र सोळंके, मारोती विटेकर सर,राजूभाई सय्यद,रामेश्वर पठाडे, शाहेद भाई पठाण,सदाशिव रोडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# दिमतीला चोरीच्या दुचाकी,लोकेशनला महागडे मोबाईल;दरोड्याच्या तयारीत असलेले चार दरोडेखोर जेरबंद!

## ग्रामस्थांची सतर्कता अन् अंभोरा पोलिसाची तत्परता

आष्टी ।प्रतिनिधी

पुणे,अंबाजोगाई, श्रीरामपूर येथील मित्र एकत्र आले.स्वताची मौजमजा करण्यासाठी महागड्या चोरीच्या दुचाकी दिमतीला घेऊन लोकेशनला महागडे मोबाईल जवळ ठेवत जबरी चोरी करणारे दरोडेखोर धामणगांव परिसरात दरबार हॉटेल जवळ दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना गावातील तरूणांनी प्रसंगावधान राखत चार जणांना दुचाकीसह पकडून रविवारी रात्री अंभोरा पोलिसांच्या ताब्यात दिले.तर अन्य चार साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत.

आष्टी तालुक्यातील धामणगांव परिसरात रविवारी रात्रीच्या दरम्यान चार दुचाकीवर आठ जण संशयास्पद स्थितीत फिरत असल्याने गावातील काही तरूणांनी त्याना हटकले पण त्यांचेकडून उडावाउडवीचे उत्तर मिळत असल्याने त्याना पकडून ठेवून संशयास्पद काही अनोळखी लोक गावात असल्याची माहिती अंभोरा पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी तात्काळ धामणगांवात



येऊन सदरील संशयास्पद तरूणाना ताब्यात घेतले.पोलीस ठाण्यात पोलिसी खाक्या दाखवताच नांदेड, पाथर्डी शहरात दोन ठिकाणी चोरी केल्याची कबूली दिली.त्यांच्या संशयित हालचाली, दरोडा टाकण्याची पूर्वतयारी,विना नंबरप्लेंट चोरीच्या गाड्या व त्यांची असलेली गुन्हेगारी प्रवृत्ती यावरून अंभोरा पोलिस ठाण्यात पोलीस अंमलदार अमोल शिरसाठ याच्या फिर्यादीवरून विशाल अनिल कंधारे वय-२४ वर्षे रा.वारजे ता.हवेली जि.पुणे, अमर बाबासाहेब हजारे वय ३० वर्षे रा.वाघाळा ता.अंबाजोगाई जि.बीड ह.मु साई समृद्धी अपार्टमेंट शिवने देशमुखवाडी ता.हवेली जि.पुणे , अमित आण्णागोडा पाटील वय-३० वर्षे रा.रामनगर शिवाजीचौक वारजे माळवाडी ता.हवेली जि.पुणे, तुषार आनंद भरोशे, रा. वारजे माळेवाडी पुणे, याच्यावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तर

३ लाख ४० हजारांच्या ४ दुचाकी व १ लाख २५ हजारांचे दोन मोबाईल असा एकूण ४ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आष्टी न्यायालयात आरोपीना हजर केले असता न्यायालयाने त्याना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे करीत आहेत.

चार दुचाकीसह चार जणांना अटक करण्यात आली असून अन्य चार साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत.त्यांच्या ताब्यात मिळालेल्या दुचाकी वाहणापैकी एक दुचाकी नांदेड येथून चोरीलेली आहे तर एक दुचाकी कालच पाथर्डी येथून जबरी चोरी केलेली आहे असे दोन गुन्हे उघड करण्यात अंभोरा पोलिसांना यश आले आहे. तपासात आणखी काही गुन्ह्याची उकल होऊ शकते असे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यानी सांगितले.

# हो धनु भाऊ ही चूक आम्ही केली, पुढे पण करणारच- खुर्शीद आलम

काल झालेल्या भाजप प्रणित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या अल्पसंख्यांक मेळाव्यात आपण अल्पसंख्यांक समाजाला उद्देशून खास करून मुस्लिम समाजाला सांगितलं की आम्ही लोकसभेला चूक केली पंकजा ताई ला मतदान केले नाही .. हो नाही केलं आणि कदापि करणार नाही आणि ही चूक आम्ही आणि बीड जिल्ह्याचा नव्हे तर अखब्या भारताचा इमानदार बहाद्दर आणि गैय्युर मुस्लिम समाज एक वेळा नाही तर शंभर वेळा ही चूक करणार,

कारण आमचं ताईशी काही वैर नाही पण ताई ज्यापक्षाकडून निवडणूक लढवीत होत्या त्या भाजपा पक्षाशी आमचं राजकीय वैर आहे, कारण सांगायची गरज नाही मुस्लिम समाज काय अखब्या भारताला माहीत आहे की भाजप जी काय पॉलिसी आहे, आज पर्यंत आम्ही गुजरात ची दंगल विसरू शकलो नाही,मुस्लिम समाजाचा घरं जाळण्यात आली,आमच्या आई बहिणीवर बलात्कार करून त्यांना जिवंत जाळण्यात आले. गर्भवती आई च्या पोट चिरून त्याचं अर्भक तलवारीवर नाच्वण्यात आलं, बिल्कीस बानू बलात्कार प्रकरणात दोषींना सोडुन त्या पापी लोकांचा मुस्लिम समाजाच्या नाकावर टिच्चून जागोजागी सत्कार करण्यात आलं हार तुरे देऊन गौरवण्यात आले,गौरक्षकच्या नावाखाली हजारो तरुणाची हत्या करण्यात आली, ही गोष्ट मुस्लिम समाज कदापि विसरणार नाही,आमच्या धार्मिक विषयात लुळबुळ करण्यात येत आहे तीन तलाक असो, समान नागरिक कायदा असो वक्फ बोर्ड असो,आणि आमच्या प्रेषित मोहम्मद सल्लालाहू अलाईहोसल्लम बद्दल गरळ ओकनाऱ्या रामगिरी महाराज ला तुमचा मुख्यमंत्री स्टेज वर जाऊन पाठिंबा देतो, आणि तो तुमचा टील्लिया नितेश राणे मुस्लिमांना मशिदीत घुसून मारण्याची भाषा करतो, त्यावेळेस नाही आठवत तुम्हाला मुस्लिम समाज , त्याचं साधं निषेध करण्यासाठी तुमची जीभ काय घशात पडली होती की काय. ते मूठ भर लोक तुमचे बगलबच्चे स्वतःला मुस्लिम समाजाचे नेते मिरवून घेत आहे आणि त्यांना दिवसा आमदार झाल्याचे स्वप्न पडत आहे, जे स्वतःच्या फायद्यासाठी मुस्लिम समाजाला भाजप च्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न करत आहे, ज्यांना



आमदारकीचा गाजर दिलं ना तुम्ही ते ऐकतील तुमचं, पण हा बीड जिल्ह्याचा बहाद्दर मुस्लिम समाज ,भाजपा च्या मांडी ला मांडी लावून बसलेल्या तुमचं आणि तुमच्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी ला कधी ही भीक घालणार नाही,

आणि ते मुस्लिम समाजाचे मुंबई चे नेते ज्यांनी काँग्रेस शी गद्दरी करून भाजप चा मित्र पक्षासोबत घरोबा करून इथ येऊन सांगतात की मी अजित दादकडून अल्पसंख्यांक समाजाला सत्तेत भागीदारी मागणार , वाह रे नेते भागीदारी आणि कुणासोबत त्या मुस्लिम द्वेशी भाजपा सोबत, सिद्दीकी साहेब एवढंच तुमचं दादा ऐकत असतील तर त्यांना सांगा की मुख्यमंत्री ला सांगून त्या रामगिरी महाराज आणि नितेश राणे ला मुस्लिम समाजाबद्दल आणि आपल्या प्रेषित मोहम्मद सल्लालाहु आलय व सल्लम बद्दल प्रक्षोभक विधान केल्याबद्दल अटक करायला सांगा, उगच भाजपा च्या सांगण्यावरून कोणते ही मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाचे मेळावे घेऊन काही फायदा होणार नाही आपल्या ह्या भुलथापाला बीड जिल्ह्याचा मुस्लिम समाज बळी पडणार नाही आणि येणाऱ्या विधान सभेच्या निवडणुकीत हा मुस्लिम समाज मताची भीक घालणार नाही, आणि ठणकावून सांगतो की जी चूक आम्ही लोकसभेला केली तीच चूक आम्ही विधानसभेला सुद्धा करणार आणि एक वेळेस नाही तर शंभर वेळा तीच चूक करणार आणि भाजप प्रणित महायुती ला बीड चा बहाद्दर मुस्लिम मतदार कदापि मताची भिक घालणार नाही.




## परळी-बीड-नगर रेल्वेमार्गाची गती वाढविण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटणार

### 'मजविप' शिष्टमंडळ जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीला

माजलगाव ।प्रतिनिधी

परळी-बीड -नगर रेल्वे मार्गाचे काम संथगतीने सुरू असून त्याची गती वाढविण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असल्याचे प्रतिपादन माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांनी केले. मराठवाडा जनता विकास परिषदेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेऊन बीडसह माजलगाव,अंबाजोगाई,धारूर तालुक्यातील विविध विकास प्रश्नांबाबत निवेदन देऊन विस्तृत चर्चा केली.यामध्ये परळी-बीड-नगर रेल्वेमार्गाच्या कामासह,अंबाजोगाई तालुक्याला जिल्ह्याचा दर्जा देणे, धारूर घाटातील रस्त्याचे रुंदीकरण करणे,माजलगाव मधील शासकीय आरक्षित जागेवरील अतिक्रमणे काढणे यांसह जिल्ह्यातील ३० मागण्यांचा यामध्ये समावेश असून यासंबंधी मा.जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे पाठपुरावा करावा अशीही मागणी करण्यात आली.

माजी आमदार डी.के.देशमुख यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगवान,जिल्हा सचिव सुमंत गायकवाड शिरीष देशमुख, प्रा.पी.के.देशमुख, सुहास देशमुख,हिमांशू देशमुख, प्रा. डी. एच.थोरात, ,डी.जी.तांदळे, जी.बी.गदळे,आर. एल. राऊत,प्र.का.कल्याणकर,आर.जी.जाधव यांसह कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती



आज पाटोदा शहरातील छत्रीवाला गणेश मित्र मंडळाच्या गणपतीची चैथ्या दिवसाची आरती शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी शिवसेनेचे पाटोदा तालुका प्रमुख मुकुदजी शिंदे,युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख कृष्णा चौरे, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अभिषेक भैय्या दिवे, विनोद गूंड पाटील, दिपक घोडके पाटील, अजय गायकवाड,गणेश शिंदे,अक्षय वास्कर, गणेश चव्हाण,मुन्ना पकाले, आकाश कांकरिया, योगेश शिंदे सह मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते...!!

## होमिओपॅथी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त भव्य राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

बीड येथील स्व खा केशरकाकू क्षीरसागर यांनी १५ सप्टेंबर १९७४ साली स्थापित केलेल्या सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने बीड येथे नॅशनल होमिओपॅथिक सेमिनार तसेच बीड येथून उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा दिनांक १५ सप्टेंबर रोजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला आहे या कार्यक्रमासाठी केंद्रातील आयुष मंत्री मा नामदार श्री प्रतापराव जाधव तसेच मा ना टोकनजी साहू शहरी विकास राज्यमंत्री प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे तसेच यावेळी संस्थेचे सचिव माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर अध्यक्षस्थानी राहणार आहेत तर राष्ट्रीय होमिओपॅथिक आयोगाचे चेअरमन डॉ अनिल खुराना,राष्ट्रीय होमिओपॅथी संस्थांचे डायरेक्टर डॉ सुभाष सिंग, रजिस्ट्रेशन बोर्डाचे प्रेसिडेंट डॉ पिनांकिन त्रिवेदी राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाचे सचिव डॉ संजय गुप्ता महाराष्ट्रातील आयुष्यमान भारत या योजनेचे प्रमुख डॉ ओमप्रकाश शेटे व राष्ट्रीय आयोगाच्या मेडिकल असेसमेंट अँड रेटिंग बोर्डाचे सदस्य डॉ आंनद चतुर्वेदी, आयोगाचे रजिस्ट्रेशन बोर्डाचे सदस्य डॉ सेंथीलकुमार,आयोगाच्या एज्युकेशन बोर्डाचे डॉ मंगेश जतकर,राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ राजकुमार पाटील हे उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमात या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या व प्रथितयश संपादन केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना मा मंत्री महोदयाच्या हस्ते अवॉर्ड ऑफ एक्सलन्स या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे तसेच डिप्लोमा, डिग्री, पोस्ट ग्रॅज्युएट झालेल्या व पीएचडी झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती महाविद्यालाचे सल्लागार डॉ अरुण भस्मे व प्राचार्य डॉ महेंद्र गौशाल यांनी दिली आहे सकाळी १० वाजता नॅशनल होमिओपॅथिक सेमिनारचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये याच महाविद्यालयातुन उत्तीर्ण झालेल्या व राष्ट्रीय



व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या माजी विद्यार्थ्यांचे विविध विषयांवर व्याख्यान होणार आहे तर दुपारी १२ ते १ या वेळात माजी विद्यार्थ्यांचे मनोगत तसेच दुपारी २ वा कार्यक्रमाचे उद्घाटन मा आयुष्य राज्यमंत्री श्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे यावेळी केंद्रातील शहरी विकास राज्यमंत्री श्री टोकन शाहू हेही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील संध्याकाळी ७ ते १० या वेळात कल्चरल प्रोग्रामचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन संस्थचे अध्यक्ष नानासाहेब काकडे यांनी केले आहे

# परळीतील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### प्रकल्पग्रस्तांना ५० %टक्के जागा नोकरीमध्ये मिळणार पालक मंत्री धंनजय मुंडे यांच्या प्रयत्नांना यश

बीड ।प्रतिनिधी

प्रकल्प ग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये योग्य जागा मिळाव्या यासाठी राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री धंनजय मुंडे यांनी केलल्या विनंतीला उपमुख्यमंत्री तथा गृह मंत्री व ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी होकार दिला असून यापुढे मंजुर आकृतीबंधाच्या ५०% जागा प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये मिळणार, असल्याचा आजच्या बैठकीत निर्णय झाला.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात परळी वैजनाथ येथील थर्मल पावरच्या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्या बाबत दूरदृष्टी प्रणाली माध्यमातून बैठक आयोजित करण्यात आली, त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला. यावेळी परळीतील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न व मागण्या प्राधान्याने सोडवल्या जातील, असा शब्द देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.




मुंबईतील सह्याद्री शासकीय विश्रामगृहातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक तथा पर्यावरण वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार चंद्रशेखर बावनकुळे हे यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यासह प्रकल्पग्रंस्त प्रतिनिधी निळकंठ चाटे, श्रीकांत फड, राज गडदे, सुधीर फड, आत्माराम फड, मुजा भांगे, प्रविण मुंडे, प्रमोद नागरगोजे उपस्थित होते.

वीज निर्मिती प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात काही समस्या बाबत आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित करण्यात आली यावेळी श्री मुंडे यांनी प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्यासाठी विविध मागण्या केल्या. यामध्ये प्रशिक्षण सेवेमध्ये ३ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांना विनाअट सामावून घेण्यात यावे. कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता यांच्या झालेल्या भरतीमध्ये महानिर्मितीचा एकही प्रकल्पग्रस्त घेतला गेलेला नाही, तरी त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन रिक्त जागेमध्ये प्राधान्य देऊन समावेश करावे, २०१० पासून बंद असलेले तंत्रज्ञ ४ हे पद सुरु करुन त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्यात यावे, ज्या प्रकल्पग्रस्तांचे वय ४५ वर्षे पूर्ण झाले आहे, त्यांना समान काम समान वेतन या कायद्यान्वये वेतन देण्यात यावे अशा मागण्या होत्या. यावर उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी सांगितले, प्रकल्पग्रंस्तांच्यामुळे नवीन प्रकल्प उभारली जातात. त्यांचा विकासातील वाटा महत्वाचा आहे, त्यामुळे त्यांची सामजिक सुरक्षितता महत्वाची असून मंजुर आकृतीबंधाच्या ५०% पदे ही प्रकल्पग्रस्तांनासाठी असावीत असा निर्णय श्री फडणवीस यांनी बैठकीत घेतला. श्री बावनकुळे यांनी याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करावी अशा सुचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यासह परळी औष्णिक विद्युत केंद्रातील ९ व्या संचाबाबतही उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्यासोबत झालेल्या दूरदृश्य प्रणाली अंतर्गत झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

## कृष्णा शिंदे व तनुजा सूर्यवंशी यांचा सत्कार सोहळा संपन्न




अंबाजोगाई ।प्रतिनिधी

कृष्णा धनंजय शिंदे व तनुजा संतोष सूर्यवंशी .या दोन्ही माजी विद्यार्थ्यांचा एमबीबीएस मेडिकल ला प्रवेशित झाल्यामुळे श्री व्यंकटेश विद्या मंदिर येथे सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये समारंभ संपन्न झाला,व पुढील वाटचालीस दोघांनाही शुभेच्छा देण्यात आले.या दोघांनाही अतिशय जिद्दी व स्वबळावरअभ्यास करून आपले कर्तृत्व सिद्ध केले. श्री व्यंकटेश विद्या मंदिर चे मुख्याध्यापक ,धनंजय शिंदे व विभागप्रमुख संतोष सूर्यवंशी या दोघांचाही पालक या नात्याने त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षक वृंद स्वप्निल चौधरी, श्रीमती आरसुडे, महादेव ठोंबरे,अक्षय सिरसट,त्याचबरोबर प्राथमिक विभागातील माध्यमिक विभागातील सर्व कर्मचारी व इतर कर्मचारी अधि उपस्थित होते.

## अंबाजोगाईत मिरवणूक देखाव्याचे उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या गणेश मंडळांना बक्षिसे देणार

अंबाजोगाई (वार्ताहर)

सार्वजनिक गणेशोत्सवात उत्कृष्ट विसर्जन मिरवणूक देखावा सादर करणाऱ्या गणेश मंडळांना भरघोस बक्षिसे देणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी दिली आहे. अंबाजोगाई मध्ये उत्कृष्ट विसर्जन मिरवणूक देखावा सादर करणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांना भरघोस बक्षिसे देण्यात येणार आहेत. गणेश मंडळांसाठी असलेल्या या स्पर्धेचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणारे अंबाजोगाई शहरातील सार्वजनिक गणेश मंडळ जे दरवर्षी आकर्षक, समाजातील ज्वलंत विषयावर प्रबोधन, जनजागृती करणारे मिरवणूक देखावे साकारतात त्यांना आणखीन प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेतील विसर्जन मिरवणूक देखाव्यात पारंपरिक वाद्य, नृत्य, कला यांचे उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या पहिल्या क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेश मंडळास २१ हजार रूपये, द्वितीय क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेश मंडळास ११ हजार रूपये आणि तृतीय क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेश मंडळास ७ हजार तसेच दोन गणेश मंडळास उत्तेजनार्थ प्रत्येकी ५ हजार रूपये आणि वैयक्तिक नृत्य प्रकार सादर करणाऱ्या ५ स्पर्धकांना उत्तेजनार्थ प्रत्येकी ११००/- रूपये इतक्या रकमेची रोख पारितोषिके देवून विजेत्या गणेश मंडळांना गौरविण्यात येणार आहे. दरम्यान, उत्कृष्ट सार्वजनिक गणेश देखाव्यांची निवड करण्यासाठी एक समिती ही गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी त्यांची नांव नोंदणी करण्यासाठी अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख - ९४२०९०११११, ॲड.प्रशांत पवार - ९७६५५५५४००, संजिवनीताई देशमुख - ८७८८२०४०५६ आणि प्रमोद गवळे - ९५१८५०२४२४ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



समाजाच्या न्याय हक्कासाठी रिपाई संयुक्त राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग यांच्या माध्यमातून दलित समाजाच्या कसत असलेल्या गायरान जमिनीच्या संदर्भात व असंख्य अडीअडचणी निवेदनाद्वारे गेवराई तालुक्यातील सर्व समाज बांधवांना एकत्रित करून सामाजिक न्याय विभागाच्या सोबत जोडून निदर्शने करण्याचा प्रयत्न करत होतो पण निदर्शनाचा स्वरूप हे मोर्चा असल्यासारखं झाल्याकारणाने गेवराई तहसीलदार सुद्धा. गडबडून गेला.निदर्शनाचा स्वरूप मोर्चामध्ये झाल्यासारखं त्याला वाटलं.. हीच ताकत समाजाची सामाजिक न्याय विभागाची .क्रांतिकारी सर्वांना जय भीम..

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT